# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./२००/२०२० दि.२८/१०/२०२०

## परिपत्रक

**विषय : तंबाखु, दारु/मद्यपान/नशापान इत्यादींचे सेवनावर दंडात्मक व कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत..**

संदर्भ :
१) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९
२) सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने कायदा, २००३
३) सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र. तंनिका २०१५/प्र.क्र.४५५//आ-५, दि. ०४/०१/२०१६
४) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम, १९७९ (दि. ३१ जुलै २००८ पर्यंत सुधारित)
५) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे परिपत्रक क्र. गों.वि./आस्था/२६३१/२०१६, दि. २८/१०/२०१६

उपरोक्त विषयान्वये शासन निर्णय दि. ०४/०१/२०१६ अन्वये तंबाखु व दारु यांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामावर उपाययोजना करणे आणि तंबाखु व दारु सेवन न करण्याबाबत जनजागृती करणे याकरीता गडचिरोली जिल्ह्यासाठी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगटाची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच केंद्र शासनाच्या सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने कायदा २००३ (COTPA), ची विद्यापीठ परिसरात अंमलबजावणी होण्याकरीता संदर्भ क्र. ०५ अन्वये विद्यापीठाने परिपत्रक निर्गमीत केलेले आहे. तथापी त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत असल्याचे दिसून येत नाही.

विद्यापीठाने परिपत्रक निर्गमीत करुनही विद्यापीठ परिसरामध्ये असे प्रकार होत असल्याचे निदर्शनास आल्याने ह्याबाबत वरिष्ठ पातळीवर गंभीर स्वरूपाची दखल घेण्यात आलेली आहे. तसेच ह्यासंदर्भात चाचपणी करण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांकडून प्राप्त आदेशान्वये **'गुप्त पाळत व शोध समिती'** गठीत करण्यात आली असून ही समिती विद्यापीठातील सर्व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, अभ्यागत यांचेवर पाळत ठेवेल व असा प्रकार आढळून आल्यास त्याबाबत गोपनिय अहवाल विद्यापीठ प्रशासनाला सादर करेल. त्या अहवालाच्या अनुषंगाने संबंधीतावर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांच्या अनुषंगाने कटोर कार्यवाही करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**(डॉ. ईश्वर मोहुर्ले)**
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रत माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव :-**
१) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) सर्व प्रशासकीय विभागांचे विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
३) सर्व शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली